पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०९**

**सभावृत्तांत**

दिनांक - **१०/०३/२०२२** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा गुरूवार, दिनांक **१०/०३/२०२२** रोजी **दु.२.३०** वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जानेवरी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली होती. मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती या महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती यांचे दालनातून सभा संचलित केली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात तर काही सन्मा. सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा.सविता बाळकृष्ण खुळे - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
५. मा.गोफणे अनुराधा देविदास

या शिवाय मा. उल्हास जगताप - नगरसचिव, मा. अजय चारठाणकर - उप आयुक्त, मा. सुहास बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) विषय दाखल करुन घेऊन मान्यता मिळणेबाबत.
मा. निर्मला गायकवाड व मा. अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा.महिला व बालकल्याण समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक ०८) दिनांक २४/०२/२०२२ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले**

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १०/०३/२०२२
सुचक - मा. निर्मला गायकवाड अनुमोदक - मा. अनुराधा गोफणे
संदर्भ - मा. निर्मला गायकवाड व मा. अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

नागरवस्ती विभागामार्फत कोरोना काळातील विधवा महिलांना सिंबायोसिस संस्थेमार्फत विविध प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. या महिलांना जाण्यायेण्याची सुविधा तसेच यामुळे अशा प्रकारचे प्रशिक्षण इन्स्टिट्युट मध्ये घेण्यात येणार असेल तर अशा सर्व महिलांना जाण्यायेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सविता बाळकृष्ण खुळे)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/९९/२०२२
दिनांक : ११/०३/२०२२



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.